पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १२/५/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १०४**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/४/२०२० ते दि.२५/४/२०२० अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/३०९ दि. ३०/४/२०२० चे पत्र.

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १०५**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे मार्च २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/३७४ दि.२७/४/२०२० चे पत्र.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १०६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/३/२०२० ते दि.३१/३/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/५४ दि.४/५/२०२० चे पत्र.

**विषय क्र. १०७**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१/४/२०२० ते दि.१५/४/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/५५ दि.४/५/२०२० चे पत्र.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. १०८**

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रभागातील पडिक हद्दीतील स्वच्छतेसाठी बीटनुसार झाडण काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लोकराज्य स्वयम रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादत यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६,६८,५२,३०७=५७ पेक्षा ९.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७,३५,३०,८५३=१० पर्यंत निविदा सादर केली असून त्याप्रमाणे इस्टिमेट मान्य र.रु.६,६८,५२,३०७=५७ पर्यंत काम करून घेणेस आणि सन २०१९ चे आर्थिक वर्ष संपल्याने दि.१/४/२०२० पासून काम करुन घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/५२ दि.३०/४/२०२० चे पत्र.

**विषय क्र. १०९**

पुणे महानगरपालिकेच्या विविध मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथे निर्जंतुकीकरण करणेसाठी वापरण्यात येणाऱ्या क्लोरीन डायऑक्साइड पावडरचा पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.९७,५०,०००/– पेक्षा ०.५%

कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९७,०१,२५०/- वस्तु व सेवा करासह पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/५३ दि.४/५/२०२० चे पत्र.

**संकिर्ण**

**विषय क्र. ११०**

बिबवेवाडी स.नं. ६५९/४ व ६५९/५ या जागेचा ताबा पुणे महानगरपालिकेकडे आहे. त्यानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र. १ व २ नुसार मे.उच्च न्यायालयाचे आदेश अवलोकन होवून सदर मिळकतीच्या जागेचा मोबदला र.रु. २,५१,८४,७८०/- श्री.ईश्वर नरेंद्र चिल्लाळ यांचेतर्फे कुलमुखत्यारधारक श्री.अरविंद मा.कोंढाळकर यांना रोख स्वरुपात अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/५१ दि.३०/४/२०२० चे पत्र.

**विषय क्र. १११**

पुणे महानगरपालिकेकरिता Managed Cloud Service Provider या कामासाठी उपलब्ध नागरिकाभिमुख सेवासुविधा व दैनंदिन प्रशासकीय कामकाज विनाव्यत्यय चालू ठेवण्याच्या दृष्टीकोनातून मे. महाराष्ट्र शासन निर्गमीत मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भांकित शासन निर्णयातील तरतूदी व दर पत्रकानुसार M/s. ESDS Software Solutions Pvt. Ltd. या कंपनीची नेमणूक करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मावतं/५६ दि.५/५/२०२० चे पत्र.

१. मे. महाराष्ट्र शासन निर्गमीत मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भांकित शासन निर्णयानुसार M/s. ESDS Software Solutions Pvt. Ltd. यांचे मार्फत पुणे महानगरपालिकेस Cloud Services सदर नमूद शासन निर्णयातील तरतूदी नुसार, दरपत्रकानुसार, व सदर शासन निर्णय अमलात असल्याची नमूद कालावधी (दिनांक ०५/०१/२०२० ते ३०/०४/२०२१) पर्यंत उपलब्ध करून घेणेस.
२. मॅनेजड क्लाउड सर्व्हिस पुरविणेकरिता M/s. ESDS Software Solutions Pvt. Ltd. यांना कार्यादेश देणेस व मे. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस.
३. मे. महाराष्ट्र शासन निर्णयातील नमूद कालावधीत भविष्यातील बदलणाऱ्या शासन निर्णयातील दरानुसार पुणे मनपामार्फत घेण्यात येणाऱ्या Cloud Services चे बिल अदा करणेस.
४. पुणे मनपाच्या विविध विभागांच्या भविष्यातील गरजेनुसार व मागणीनुसार कमी अधिक प्रमाणात मे . महाराष्ट्र शासन निर्णयातील तरतुदीनुसार व दरपत्रकानुसार क्लाऊड सर्व्हिस कार्यान्वित करून बिल अदा करणेस.
५. पुणे महानगरपालिकेस आवश्यक असेलेले मॅनेजड क्लाऊड सर्व्हिस पुरविणेकरीता M/s. ESDS Software Solutions0 Pvt. Ltd. या कंपनीस प्रतिमहा अंदाजे र.रू. २७,६८,८५९=४५ अदा करणेस.
६. सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.
   RE11N103
   सन २०१९-२०२०
   विशेष प्रकरचे हिशेबी कामे कॉम्प्यूटर करून घेणे,
   ERE अंमलबजावणी, Software Development,
   GIS, Works Management System, Kiosk व
   तदनुषंगिक कामे करणे.

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**